नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०१/१०/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा शिवाजी चौक पारशिवनी येथे दिनांक ३०/०९/२२ चे १७.४५ वा. सुमारास एम.एच— ४०/सीडी—५५८३ क्रमांकाचा १६ चक्का टिप्पर चा चालक आरोपी नामे— यशवंत संपत सिंगरे वय २८ वर्ष, रा. बिजागोरा ता. मोहखेड जि. छिन्दवाडा (म.प्र.) याने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन तसेच वाहन चालवित असता मोबाईल फोनवर बोलत जाऊन समोर जाणाऱ्या एमएच— ४०/बीन—१२४५ क्रमांकाचा अँक्टीव्हा मोपेडचा चालक नामे— बबन हिंगणकर(मृतक), वय ४५ वर्ष रा. दहेगाव जोशी यांना मागुन धडक दिली. या अपघातात अँक्टीव्हा चालकाचे मरणास आरोपी हा कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राधेश्याम रमेशजी नखाते, वय ३४ वर्ष, रा. काळाफाटा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि नागुलवार मो.क्र. ९९२३३७२६४७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर**:— अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडखैरी बसस्टॉप येथे दिनांक ३०/०९/२२ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— देविदास सदाशिव खंडाते वय ५९ वर्ष रा. मेंटाउमरी ता. हिंगणा हे आपले घरी हाजर असतांना गावातील नागेश्वर सुरकार याने फोनव्दारे माहीती दिली की, आरोपी क्र. ०१. देवांनद शंकर ठाकरे हा एमएच— ४०/बीयू— ४५९९ क्रमांकाची होंडाशाईन चालवित असून त्याच्या मागे फिर्यादीचा मुलगा सुरज देवीदास खंडाते(मृतक), वय २७ वर्ष, रा. मेंटापांजरी यास बसून जात असतांना त्याने आपले वाहन भरधाव वेगाने व लापरवाहिने चालूवन नागपूर कडून अमरावती कडे जात असतांना गोंडखैरी बसस्टॅन्ड जवळ मागून येणारा एमएच— ४०/बीजी— ३०१४ क्रमांकाच्या कंटेनरचे चालक आरोपी क्र. २ याने आपले वाहन भरधाव वेगाने चालवित असता यातील आरोपी क्र ०१. च्या मोटरसायकलचा मागे बसलेला सुरज खंडाते यास धडक मारून त्याच्या मरण्यास कारणीभूत झाला व दोन्ही आरोपी चालक हे वाहन घेवून पळून गेले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा नझिर कुरेशी मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास परिपोउपनि टिपले मो.क्र. ९९६०७५७१७४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**